MHKO190006912025

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, राधानगरी**
**यांचे न्यायालयात**
**निशाणी क्रमांक - ०४ खालील आदेश**
**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.२१/२०२५**
**(दिनांक ०२/०७/२०२६)**

प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ (इथून पुढे कौटुंबिक हिंसाचार कायदा असे संबोधण्यात येते) मधील कलम २३ अन्वये अंतरीम पोटगी मिळणेकरीता सादर केला आहे.

**अर्जदाराची थोडक्यात कथने :-**

२. अर्जदार हिने आपले अर्जात असे कथन केले आहे की, वि.प.क्र.१ सोबत तिचा विवाह दि. ०२/०६/२०२४ रोजी परिते येथे पार पडला. वि.प.क्र. २ हे तिचे सासरे तर वि.प.क्र.३ या तिच्या सासु आणि वि.प.क्र.४ हे तिचे दीर आहेत. विवाहानंतर अर्जदार सासरी वास्तव्यास असताना तिला वि.पं. कडून शारिरीक, मानसिक तसेच आर्थिक स्वरूपाचा सातत्यपूर्ण छळ सहन करावा लागल्याचे अर्जदार हिने नमूद केले आहे.

३. अर्जदारच्या कथनानुसार वि.प. यांनी अर्जदार हिस चारच दिवस व्यवस्थित नांदविले व लग्नानंतर लगेचच अर्जदार हिस वि.प.क्र.१ चे शामल शेटके हिचे सोबत प्रेमसंबंध असल्याचे खात्रीलायक कळाले. वि.प.क्र.१ याने त्यानंतर बरेचदा अर्जदार हिस उगाच तिच्याशी लग्न केले, शामल सोबत लग्न केले असते असे म्हणून टोमणे मारले. अर्जदारने पुढे कथन केले की, वि.प.क्र.१ ने दि.०३/०७/२०२४ रोजी प्रेयसी शामल करिता औषध पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला होता. अर्जदारच्या घरातील सर्वांनी समजावल्यामुळे वि.प.क्र.१ ने माफी मागुन असा प्रकार पुन्हा करणार नाही असे सांगितले. परंतु, त्यानंतर देखील वि.प.क्र.१ हे वारंवार अर्जदार हिला आत्महत्या करेन अशा धमक्या देत होते. वि.प.क्र.१ ने वारंवार अर्जदारकडे घटस्फोटाची मागणी केली. वि.प.क्र.१ चे

घरचे हे अर्जदार हिला काहीच काम येत नाही असे म्हणून सतत टोमणे मारत असे. वि.प.क्र.१ ने अर्जदारकडे तिच्या माहेरहून र.रू. १,००,०००/- ची मागणी केली. ती मागणी पूर्ण न केल्याने वि.प.क्र.१ ने अर्जदार हिस शिवीगाळ करून मारहाण केली. दि.२१/०८/२०२५ रोजी अर्जदार माहेरी गेल्या असता दि.२६/०८/२०२५ रोजी वि.प.क्र.१ ने घटस्फोट घेऊ असा व्हॉट्सॲप मेसेज केला. अर्जदार व मध्यस्थ पाहुण्यांनी अर्जदार हिस नांदायला घेऊन जाणेकरिता अनेक प्रयत्न केले परंतु, वि.प.क्र.१ ने अर्जदार हिस नांदायला घेऊन जाणेकरिता कोणताही प्रयत्न केलेला नाही. कोणत्याही कारणाशिवाय अर्जदार यांचा त्याग केलेला आहे. अर्जदार हिचा शारिरीक, मानसिक व आर्थिक छळ केला आहे. परिणामी, अंतिम निकालापर्यंत अर्जदार हिने र.रू.२५,०००/- अंतरिम पोटगीची मागणी केली आहे.

**<u>वि. प. क्र. १ चे थोडक्यात म्हणणे :</u>**

४. वि.प.क्र.१ यांनी नि. १६ कडे म्हणणे दाखल करून अर्जातील सर्व आरोप नाकारले आहेत. वि.प. यांनी विवाह व नातेसंबंध मान्य केले आहेत. वि. प. यांच्यामध्ये अर्जदार हि कोणत्याही संयुक्तीक कारणाखेरीज दि.२१/०८/२०२५ रोजी स्वेच्छेने वि.प. यांचा त्याग करून गेली आहे. अर्जदार हिने वि.प.क्र.१ सोबत संसार करायची ईच्छा नसलेने वि.प.क्र.३ यांचेसोबत किरकोळ कारणावरून भांडण करणे, उध्दट उत्तरे देणे अशी वर्तवणूक करत असे. अर्जदार हिने वि.प.क्र.१ यांना कधीही शारिरीक व मानसिक सुख दिलेले नाही. अर्जदार हि जीव देण्याची धमकी वि.प.क्र.१ यांना देत असे. अर्जदार या परस्पर माहेरी निघून गेल्याने सदरील वादातून वि.प.क्र.१ यांनी विषारी औषध पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. वि.प.क्र.१ यांस अर्जदार हिच्याशी संसार करण्याची आजही प्रामाणिक ईच्छा आहे. दि.२८/०८/२०२४ ते दि.१७/०९/२०२४ या कालावधीमध्ये अर्जदार माहेरी निघून गेलेल्या असताना वि.प.क्र.१ ने अर्जदार हिस वारंवार फोन करून नांदायला येणेसाठी प्रयत्न केले. परंतु, अर्जदार हिने काही एक ऐकले नाही. सबब, सदरील अर्ज फेटाळण्याची वि. प. यांनी विनंती केली आहे.

५. अर्ज व म्हणणे मधील कथनांचे तसेच दोन्ही बाजुच्या वकीलांच्या

युक्तीवादाचे अवलोकन केले असता माझ्यासमोर खालील विचाराधीन प्रश्न उत्पन्न झालेले आहेत. त्यावरील कारणमिमांसा निष्कर्षासह पुढीलप्रमाणे नोंदवित आहे :

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही प्रथमदर्शनी हे सिध्द करते काय की, वि.प. यांनी तिचे विरुध्द कौटुंबिक हिंसाचार केला आहे? | होकारार्थी. |
| २. | अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्याकरीता पात्र आहे काय ? आहे तर, किती ? | होकारार्थी. (अर्जदार हिला दरमहा रु.५०००/- प्रमाणे) |
| ३. | काय आदेश? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात आला. |

## का र ण मि मां सा

६. अर्जदारतर्फे व वि. प. क्र. १ तर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

७. अर्जदार हिने नि. क्र. १७ कडे तर वि.प.क्र. १ ने नि.क्र. १८ कडे मालमत्ता व उत्तरदायित्वाचे शपथपत्र दाखल केले आहे. संरक्षण अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात कौटुंबिक घटना अहवाल नि.क्र.२१ कडे दाखल केलेला आहे.

### विचाराधीन प्रश्न क्र. १ बाबत :

८. अर्जदार व वि.प.क्र.१ हे पती पत्नी आहेत ही बाब निर्विवाद आहे. या टप्प्यावर हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, अंतरिम अर्ज ठरवतेवेळी अर्जदाराने वि. पं. कडून प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे दाखविले आहे काय, याचा विचार करावयाचा आहे. अर्जदाराने आपल्या अर्जात शारिरीक, मानसिक, भावनिक तसेच आर्थिक स्वरूपाच्या हिंसाचाराच्या अनेक विशिष्ट घटना तारखेनिशी नमूद केल्या आहेत.

या घटना केवळ सर्वसाधारण आरोप स्वरूपाच्या नसून त्या दिनांक, परिस्थिती व वर्तनाच्या स्पष्टीकरणासह मांडण्यात आल्या आहेत. या सोबतच कौटुंबिक घटना अहवाल (नि.क्र.२१) हा अर्जदाराच्या कथनास प्रथमदर्शनी पुष्टी देणारा आहे.

९. महत्वाचे म्हणजे, हे मान्य व निर्विवाद तथ्य आहे की, अर्जदार व वि.प.क्र.१ हे दि.२१/०८/२०२५ रोजी पासून स्वतंत्र राहत असून त्या तारखेपासून वि.प.क्र.१ यांनी अर्जदार हिस कोणतीही आर्थिक मदत केलेली नाही. कौटुंबिक हिंसाचार कायद्याचे कलम ३ नुसार हि बाब देखील आर्थिक हिंसाचारामध्ये मोजली जाते.

१०. वि.प.क्र.१ ने नि.क्र.२०/५ आणि २०/६ वर दाखल अर्जदार हिचे विरूध्द अदखलपात्र गुन्हा आणि अर्जदार हिस वि.प.क्र.१ ने महिला समपुदेशन केंद्र यांचेमार्फत पाठविलेली नोटीस हि या टप्प्यावर वरील इतर बाबींचा विचार करता प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला नाही असे दर्शविण्यास उपयोगी ठरत नाही.

११. या पार्श्वभूमीवर अर्जदार हि स्वत:हून घर सोडून गेली काय किंवा कथित परिस्थितीमुळे तिला घर सोडावे लागले काय, हा मुद्दा अंतिम सुनावणीचा विषय आहे. सद्यस्थितीत उपलब्ध नोंदी, अर्जदाराची कथने आणि कौटुंबिक घटना अहवाल याचे अवलोकन करता अर्जदार हिचेवर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. परिणामी **प्रश्न क्र. १** चे उत्तर **होकारार्थी** नोंदवित आहे.

**<u>विचाराधीन प्रश्न क्र. २ बाबत :</u>**

१२. अर्जदार हि प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे दाखविण्यात यशस्वी झाल्याने कौटुंबिक हिंसाचार कायद्यानुसार अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे अंतरिम पोटगीची रक्कम किती, हा पुढील प्रश्न उद्भवतो.

१३. अर्जदार हिने आपला दरमहा खर्च र.रू.२०,०००/- असल्याचे नमुद केले आहे. अर्जदार हिने वि.प.क्र.१ यास दरमहा र.रू.५७,०००/- इतका पगार, वि.प.क्र.२ व

३ यांना शेती व दुग्ध व्यवसायातून प्रतिवर्षी र.रू.२,५०,०००/- इतका नफा तर वि.प.क्र.४ ला त्याचे व्यवसायातून प्रति महिने र.रू.६०,०००/- नफा असल्याचे नमूद केले आहे. याउलटत वि.प.क्र.१ ने अर्जदार हिस प्रतिमहिना र.रू.३०,०००/- उत्पन्न असल्याचे सांगितले आहे. वि.प.क्र.१ ने त्यांचा पगार र.रू.३५,८०३/- व तेवढाच त्यांचा दरमहा खर्च असल्याचे सांगितले आहे.

१४. अभिलेखाचे अवलोकन करता वि.प.क्र.१ ने त्यांची वेतन बिले नि.क्र. २१/४ वर हजर केली आहेत. त्याचे अवलोकन करता वि.प.क्र.१ यांस प्रति महिना साधारण र.रू.३५,०००/- पगार असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. नि.क्र.२०/७ वरील खातेउताऱ्याचे अवलोकन करता प्रति महिना साधारण र.रू.९,०००/- चा हप्ता वि.प.क्र.१ चे बँक खात्यातून जात असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. नि.क्र.२० सोबत दाखल वि.प.क्र.३ यांची वैद्यकीय कागदपत्रे पाहता त्यांना कॅन्सर वरील उपचाराकरीता वैद्यकीय खर्च असल्याचे दिसून येते. परंतु, सदरील खर्चाची पूर्ण जबाबदारी हि वि.प.क्र.१ वरच आहे असे अभिलेखावरून स्पष्ट होत नाही.

१५. अर्जदार हिने वि.प.क्र.१ ते ४ यांच्या उत्पन्नाबाबत फुगवे आकडे केवळ नमुद केले असुन तसा कोणताही पुरावा अभिलेखावर हजर केलेला नाही. नोंदविण्यात येते की, अंतरिम पोटगीची रक्कम निश्चित करतेवेळी अर्जदार ही देखील वि. प. क्र. १ सारखीच शिक्षित व सक्षम असल्याची बाब दुर्लक्षित करता येणार नाही. अर्जदाराचे शिक्षण, खर्च, वि.प. यांचे शिक्षण, खर्च, जबाबदारी या सर्व गोष्टींचा समतोल करून, वस्तूनिष्ठ व न्याय्य विचार करता अर्जदार हिला या टप्प्यावर दरमहा रू. ५,०००/- अंतरिम पोटगी देणे योग्य व न्यायोचित राहील. सबब, विचाराधीन **प्रश्न क्र.२** चे निष्कर्ष **होकारार्थी** नोंदवित आहे.

**<u>विचाराधीन प्रश्न क्र. ३ बाबत:-</u>**

१६. प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार हिने दरमहा रू. २५,०००/- च्या अंतरिम पोटगीची मागणी केली होती. परंतु, वर नमुद सर्व बाबींचा विचार करता अर्जदार हिस दरमहा अंतरिम पोटगी रू. ५,०००/- देण्यात येते. वर नमुद चर्चा व विचाराधीन प्रश्न क्र.१

व २ चे निष्कर्ष लक्षात घेता, अर्ज अंशतः मंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे :

**- आदेश -**

१. अर्ज (नि.४) अंशतः मंजूर करण्यात आला.

२. वि.प.क्र.१ याने अर्ज दाखल तारखेपासुन ते अंतिम निकालापावेतो अथवा अन्य कोणता पुढील विपरीत आदेश पारीत होईपर्यंत अर्जदार हिला दरमहा रक्कम रु.५०००/- (रुपये पाच हजार फक्त) इतकी अंतरिम पोटगी द्यावी.

३. सदर अर्जाचे खर्चाचा विचार अंतिम आदेशाचे वेळी करण्यात येईल.

४. सदर आदेशाची प्रत अर्जदार व वि.प. यांना विनामुल्य देणेत यावी.

Sd/-

दिनांक : ०२/०७/२०२६ **( एन. पी. काकडे )**

ठिकाण : राधानगरी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र. २) राधानगरी.

---